# प्राथमिक शिक्षण पदविका परीक्षा

## (अभ्यासक्रम - 2016)

## परीक्षा जून-2026

## डी.एल.एड्. परीक्षा जून-2026
## अधिसूचना व ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कार्यक्रम

प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सर्व प्राचार्य, अध्यापक विद्यालये यांनी परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत महत्वपूर्ण सूचना

**प्रत्यक्ष परीक्षा** :- डी.एल.एड् परीक्षेचे दि. 02/06/2026 ते 10/06/2026 या कालावधीत आयोजन केलेले आहे.

**विशेष टिप** :- जून 2023 व त्यापुढील वर्षात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे अध्यापक विद्यालयांनी (अभ्यासक्रम 2016) संबंधित परीक्षार्थीचे नियमित परीक्षा शुल्कासह ऑनलाईन आवेदनपत्र भरणे.

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, दुसरा व चौथा मजला सर्वे नं. 832-अ, प्लॉट नं.178/179, बालचित्रवाणीजवळ, आघारकर रिसर्च इन्स्टिटयूट मागे, आघारकर मार्ग, भांबुर्डा, शिवाजीनगर पुणे- 411004
फोन : (020)29709617/29709396 website www.deledexam.in
Email – www.mscepune@gmail.com

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील डी.एल.एड्.
# परीक्षेशी संबंधित अधिकारी

| अ. क्र. | नाव | हुद्दा | दूरध्वनी |
|---|---|---|---|
| | | | कार्यालय |
| १. | डॉ. नंदकुमार बेडसे (भा.प्र.से.) | अध्यक्ष | 020-29709617 |
| २. | श्री. महेश चोथे | आयुक्त | 020-29709617 |
| ३. | श्रीम.प्रिया शिंदे | उपायुक्त | 020-29709617 |
| ४. | श्री. महेंद्र वासनिक | सहा. आयुक्त | 9822054149 |
| ५. | श्री. संतोष जैन | अधीक्षक तथा मूल्य. अधिकारी | 9421475532 |
| ६. | श्री. शिवाजी पाटील | लिपीक | 9822592425 |

टीप :-सदरचे दूरध्वनी क्रमांक फक्त तातडीच्या कार्यालयीन संपर्कासाठी आहेत. ते विद्यार्थी /पालकांना देऊ नयेत. कारण विद्यार्थ्यांची कोणतीही वैयक्तिक माहिती परिषदस्तरावर उपलब्ध नसते. सदरच्या माहितीसाठी संबंधित अध्यापक विद्यालयाशी संपर्क साधावा.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पान क्र. |
| --- | --- | --- |
| 1. | सर्व अध्यापक विद्यालयांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे वेळापत्रक | 4 |
| 2. | अध्यापक विद्यालयांनी नोंदणी (Registration) करणेबाबत सूचना | 5 |
| 3. | परीक्षेसाठी संगणकीय आवेदनपत्र भरून सादर करण्याची नियमावली | 6 |
| 4. | ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यापूर्वी प्राचार्यांनी घ्यावयाची दक्षता व परीक्षा शुल्क, संस्था नोंदणी शुल्क व विद्यार्थी नोंदणी शुल्क | 7 ते 9 |
| 5. | ऑनलाईन/विलंब शुल्काने/अतिविलंब शुल्काने आवेदनपत्र भरण्याचे वेळापत्रक व प्रि-लिस्ट भरण्याबाबत घ्यावयाची दक्षता | 10 |
| 6. | डी.एल.एड. 50 अहवाल भरताना घ्यावयाची दक्षता | 11 |
| 7. | विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्र भरणेसाठी मार्गदर्शक सूचना कृतीओघ तक्ता (Flow Chart) | 12 |
| 8. | ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणेबाबत सूचना कृतीओघ तक्ता (Flow Chart) | 13 |
| 9. | जून-2026 परीक्षेचे वेळापत्रक (प्रथम वर्ष) | 14 |
| 10 | जून-2026 परीक्षेचे वेळापत्रक (द्वितीय वर्ष) | 15 |

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे**

**प्राथमिक शिक्षण पदविका परीक्षा : जून-2026 (D.El.Ed.)**

**सर्व अध्यापक विद्यालयांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे ते**

**विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे वाटप करणेबाबत कामाचे**

# वेळापत्रक

| अ.क्र. | कामाचा तपशील | दिनांक/कालावधी |
|---|---|---|
| 1. | अध्यापक विद्यालय नोंदणी (Registration) करणे व ऑनलाईन शुल्क (Online Payment ) भरणे. | 01/04/2026 ते 04/05/2026 |
| 2. | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अधिनस्त अध्यापक विद्यालयांना Login ID आणि Password देणे व तपासून मान्य (approve) करणे. नवीन रजिस्ट्रेशन केलेल्या अध्यापक विद्यालयांना मान्यता देणे | 01/04/2026 ते 04/05/2026 |
| 3. | जून 2023 व त्यापुढील वर्षात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे अध्यापक विद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांचे नियमित परीक्षा शुल्कासह ऑनलाईन आवेदनपत्र भरणे. | 01/04/2026 ते 10/04/2026 |
| 4. | विलंब शुल्क भरून ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे. | 11/04/2026 ते 18/04/2026 |
| 5. | अतिविलंब शुल्क भरून ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे. | 19/04/2026 ते 23/04/2026 |
| 6. | सर्व अध्यापक विद्यालयांनी प्रिलिस्ट दुरूस्ती Online करणे. | 24/04/2026 ते 28/04/2026 |
| 7. | प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी परिषदेच्या संकेत स्थळावर परीक्षा केंद्र ऑनलाईन निश्चित करून देणे. | 24/04/2026 ते 29/04/2026 |
| 8. | सर्व अध्यापक विद्यालयांचे अंतर्गत व प्रात्यक्षिक गुण (डी.एल्.एड्.50 मध्ये) Online भरणे. | 27/04/2026 ते 30/04/2026 |
| 9. | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी अधिनस्त अध्यापक विद्यालयांची डी.एल्.एड्.50 तपासून मान्य ( Online approve) करणे. | 04/05/2026 ते 08/05/2026 |
| 10. | जिल्हा अंतर्गत अध्यापक विद्यालयांनी डी.एल्.एड्.50 ची Excel Sheet हार्ड कॉपी प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचेकडे सादर करणे. | 11/05/2026 ते 14/05/2026 |
| 11 | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी आपल्या जिल्हांतर्गत अध्यापक विद्यालय प्राचार्यांनी आपल्याकडे जमा केलेली डी.एल्.एड्.50 ची Excel Sheet हार्ड कॉपी प्रतिनिधीमार्फत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे येथे सुपूर्द करणे. | 15/05/2026 ते 20/05/2026 |
| 12. | परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन (Online) प्रवेशपत्रे उपलब्ध करणे. | 21/05/2026 पासून |
| 13. | डी.एल्.एड्. परीक्षा जून-2026 चा प्रत्यक्ष कालावधी | 02/06/2026 ते 10/06/2026 |

## अध्यापक विद्यालयांनी नोंदणी (Registration) करणेबाबत सूचना -

1) संगणकीय नोंदणी फॉर्म परिषदेच्या www.deledexam.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

2) www.deledexam.in ही वेबसाईट open केल्यानंतर Home page दिसेल. त्यामध्ये Institute Registration वर Click करावे. Institute registration फॉर्म दिसेल. तो फॉर्म प्रत्येक अध्यापक विद्यालयाने Online भरून Submit बटनावर Click करावे.

3) Submit केल्यानंतर भरलेली माहिती दिसेल त्यामध्ये दुरूस्ती करावयाची असल्यास go back बटनावर Click करून माहितीमध्ये दुरूस्ती करावी. दुरूस्ती करावयाची नसल्यास Online बटनावर Click करावे.

4) Online बटनावर Click केल्यानंतर तुम्ही Registration fee भरण्यासाठी Payment get way या पेजवर जाल. Pay Now या बटनावर Click करून Online फी भरावी.

5) Online फी भरल्यानंतर पैसे भरल्याची Receipt generate होईल.

6) प्राप्त Receipt वर Successful Payment असे लिहून आले तरच तुमचे Payment Successful झाले असे ग्राह्य धरावे. Receipt ची Print काढून आपल्या दप्तरी ठेवावी.

7) Payment Successful झाल्यानंतर जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या (DIET) login ला नोंदणी फॉर्म प्राप्त होतील. ते तपासून झाल्यानंतर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी Online Approval द्यावे.

8) त्यानंतर सर्व अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांच्या E-mail Id व Mobile नंबरवर User Id व Password येईल.

9) User Id व Password मिळाल्यानंतरच सर्व अध्यापक विद्यालयांनी विद्यार्थ्यांचे Online आवेदनपत्रे दिलेल्या वेळापत्रकानुसार भरावीत.

# डी.एल.एड्. परीक्षेसाठी संगणकीय आवेदनपत्रे भरणेबाबतची नियमावली

**परीक्षा कालावधी - दि. 02/06/2026 ते 10/06/2026**

प्राथमिक शिक्षण पदविका (डी.एल.एड.) परीक्षेच्या उमेदवारांसाठी परीक्षार्थी म्हणून **पात्रतेचे निकष** :-

- परीक्षार्थीचा प्रवेश शासकीय कोट्यातील असल्यास राज्य शासनाने नियुक्त केलेल्या **'राज्य डी.एल.एड्. प्रवेश समितीने'** मान्य केलेला असावा.

- प्रवेश स्पॉट/व्यवस्थापन कोट्यातील असल्यास, प्रवेशास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेतलेली असावी.

- परीक्षार्थीची 80% उपस्थिती पूर्ण असणे आवश्यक आहे.

- 70.00 ते 79.99% पेक्षा कमी उपस्थिती असणाऱ्या परीक्षार्थींची अनुपस्थिती क्षमापित करण्याचा अधिकार प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांना तर 60.00 ते 69.99% पेक्षा कमी उपस्थिती असणाऱ्या परीक्षार्थींची अनुपस्थिती क्षमापित करण्याचा अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे यांना राहील. सदर अनुपस्थिती क्षमापित करण्याची प्रकरणे परीक्षा आवेदनपत्रे भरण्याच्या कालावधीतच सादर करावीत.

- D.El.Ed. परीक्षार्थीचे अंतर्गत गुण 50% किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

- डी.एल.एड. प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे आकारिक मूल्यमापन विद्या प्राधिकरणाने दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा परिषदेच्या www.deledexam.in या संकेतस्थळावर गुणांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करणे आवश्यक आहे. एकदा गुण नोंदविल्यानंतर पुनःश्च गुणात बदल करता येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

# - ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी प्राचार्यांनी घ्यावयाची दक्षता-

**I)** परीक्षार्थीस लागू असणारा इयर कोड अचूकपणे निवडणे आवश्यक आहे कारण इयरकोडप्रमाणे परीक्षार्थ्याची सर्व माहिती संगणक पडद्यावर उपलब्ध होणार आहे. इयरकोडबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| तपशील | इयर कोड क्रमांक |
|---|---|
| **प्रथम वर्ष नियमित विद्यार्थी (First year fresh only)** | 1 |
| **प्रथम वर्ष पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी (First year repeater only)** | 2 |
| **द्वितीय वर्ष उत्तीर्ण असून फक्त प्रथम वर्षाच्या काही विषयास बसणारे विद्यार्थी (Second Year Pass & First year repeater only)** | 3 |
| **प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षेस एकाच वेळी बसणारा विद्यार्थी (Appearing for first & second year)** | 4 |
| **द्वितीय वर्ष नियमित विद्यार्थी (Second year fresh only)** | 5 |
| **द्वितीय वर्ष पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी (Second year repeater)** | 6 |

**II) सर्वसाधारण सूचना :-**

1) ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यापूर्वी माहिती पुस्तिका व सूचना वाचूनच माहिती भरावी.

2) द्वितीय वर्षाचे आवेदनपत्रे भरताना यापूर्वीचा **नजीकच्या परीक्षेचा बैठक क्रमांक बिनचूक लिहावा.** तो चुकीचा लिहील्यास अन्य विद्यार्थ्याची माहिती आवेदनपत्रावर येईल. त्याची जबाबादारी संबंधितांवर राहील. मागील गुणपत्रकावरून प्राचार्यानी मागील बैठक क्रमांकाची पडताळणी करावी.

3) निकाल जाहीर केलेल्या दिनांकापासून 6 महिन्यानंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही व अशा प्राप्त प्रस्तावातील कोणत्याही माहितीत बदल होणार नाही.

4) परीक्षा परिषदेने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावरच परीक्षार्थीस परीक्षा द्यावी लागेल. कोणत्याही परिस्थितीत केंद्र बदलता येणार नाही.

5) यापूर्वी डी.एल.एड. परीक्षेस बसलेल्या आणि गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे त्यांची प्रतिबंधित मुदत संपली असल्याची खात्री केल्यानंतरच भरावीत. गैरमार्गाचा अवलंब केलेल्या उमेदवारावर लादलेल्या शास्तीची मुदत संपण्यापूर्वी त्यांचे आवेदनपत्र परीक्षा परिषदेकडे आपणाकडून सादर झाल्यास **संबंधित प्राचार्य हे व्यक्तीशः जबाबदार राहतील व त्यामुळे उद्‌भवणा-या न्यायालयीन प्रकरणाचा खर्च संबंधित प्राचार्याना भरावा लागेल.**

6) प्रपत्र A मध्ये दिलेल्या तक्त्यातील मुद्दा क्र. 4 व 5 मधील माहिती ऑनलाईन भरावी व Submit बटनावर क्लिक करावे.

7) प्राचार्य, DIET यांनी जिल्ह्यातील प्रत्येक अध्यापक विद्यालयाची मंजूर क्षमतेची पडताळणी करूनच प्रपत्र 'A', 'B', 'C', 'D', 'E' Confirm करावीत.

8) अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांनी सोबत दिलेल्या संभाव्य वेळापत्रकानुसार कार्यवाही होईल, याची दक्षता घ्यावी.

**III)** **अ) परीक्षा पूर्व अटीची पूर्तता** : उमेदवाराने परीक्षेसाठी आवश्यक उपस्थिती व अंतर्गत काम पूर्ण केले आहे. (नियमानुसार संपर्क सत्रे पूर्ण झाली आहेत.)

**ब) प्रतिबंधित कालावधी** : गैरमार्ग प्रकरणी शिक्षा दिलेल्या उमेदवाराचा प्रतिबंधीत कालावधी पूर्ण झाला आहे.

**IV)** **अंतर्गत मूल्यमापनाचे गुणाबाबत (डी.एल.एड.)**

१) सर्व नियमित उमेदवारांचे व पुरवणी परीक्षार्थ्याचे अंतर्गत मूल्यमापनांचे गुण विहीत नमुन्यात (डी.एल.एड. 50) न चुकता परिषदेने निर्धारित केलेल्या कालावधीत परीक्षा परिषदेकडे Online सादर करावेत. विहीत कालावधीत याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास व संबंधित उमेदवार प्रात्यक्षिक गुणाअभावी अनुत्तीर्ण घोषीत झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील. अंतर्गत गुण नोंदविताना प्राचार्यांनी स्वतः खात्री करून घ्यावी.

२) डी.एल.एड.50 मध्ये अंतर्गत गुण देताना कमाल मर्यादेपेक्षा जास्त गुण दिलेले नाहीत, याची पूर्णपणे खात्री करावी. किंवा विहीत मर्यादेपेक्षा कमी गुण दिलेले नाहीत किंवा निरंक गुणदान इ. चुका केल्यास संबंधित शिक्षक व प्राचार्य या दोघांनाही जबाबदार धरण्यात येईल.

**V)** ऑनलाईन आवदेनपत्रांची संपूर्ण छाननी झाल्यानंतरच विद्यार्थी सर्व नियम व अटीच्या संदर्भात पात्र आहे की अपात्र हे ठरविण्याचा अधिकार परीक्षा परिषदेस आहे. तसेच **'परीक्षा दिल्यानंतरही संबंधितांच्या पात्रतेबाबत त्रुटी आढळल्यास संबंधितांची संपादणूक रद्द करण्याचा अधिकार परीक्षा परिषदेस राहील'** याची संबंधितांनी नोंद घ्यावी. ही बाब सर्व परीक्षार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

**VI)** **परीक्षेचा कालावधी उमेदवारांच्या निदर्शनास आणण्याबाबत** - प्राथमिक शिक्षण पदविका जून-2026 च्या परीक्षेसाठी कालावधी निश्चित केलेले वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्यानंतर उमेदवाराच्या निदर्शनास आणावे.

**VII)** **अपंगत्वाच्या सवलतीबाबत** - जे परीक्षार्थी 40% किंवा त्याहून अधिक अपंगत्व असलेले आहेत त्यांनी ऑनलाईन आवेदनपत्र भरतेवेळी तसा पर्याय निवडावा. तसेच आवेदनपत्रासोबत उमेदवाराचा फोटो असलेले जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अपंगत्व प्रमाणपत्राची छायांकित प्रत Scan करून Upload करावी.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-2014/|प्र.क्र.1/अ.क्र..2, दि.18 मार्च 2014

1. अपंग उमेदवाराला परीक्षेसाठी लेखनिक हा परीक्षा घेणाऱ्या अधिकाऱ्याने पुरवावा अथवा उमेदवाराने त्याची इच्छा असल्यास स्वतः लेखनिकाची व्यवस्था करावी.
2. परीक्षेच्या किमान 15 दिवस अगोदर अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांनी संबंधित विद्यार्थ्यास लेखनिक देणेबाबत परवानगी घेणेसाठी परिषदेकडे अर्ज सादर करावा. अर्जासोबत संबंधित विद्यार्थ्याचे 40% किंवा त्यापेक्षा जास्त अंपगत्वाचे प्रमाणपत्र साक्षांकित करुन परिषदेकडे अर्जासोबत पाठवावे. लेखनिक म्हणून जो विद्यार्थी परीक्षागृहात येणार आहे. त्याची सर्व माहिती (पूर्णनाव, पत्ता, शौक्षाणिक अर्हता) व फोटो सदर अर्जासोबत परिषदेकडे पाठवावे.

3. कोणत्या परिस्थितीत ऐनवेळी लेखनिक उपलब्ध करून देण्यास परिषदेकडे परवानगी दिली जाणार नाही. याची आपण काटेकोरपणे दक्षता घ्यावी.
4. परीक्षेचा कालावधी एक तासापेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त वेळ देताना प्रत्येक तासाला 20 मिनीटे अतिरिक्त वेळ याप्रमाणे गणना करावी.
5. अल्पदृष्टी उमेदवार लेखनिक वापरत नसला तरी त्यास प्रत्येक तासाला अतिरिक्त 20 मिनीटे वेळ देण्यात यावा.
6. उमेदवारास प्रश्नपत्रिका देताना व उत्तरपत्रिका परत घेताना त्यावर त्या त्या वेळेची नोंद घेण्यात यावी. तसेच पुरवणीपत्रिका वेळेत पुरविण्यात याव्यात.

**VIII) <u>परीक्षा शुल्क :</u> जून**-2026 परीक्षेसाठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क राहील.

**१) संस्था नोंदणी शुल्क :**

जून-2026 या परीक्षेपासून संस्था नोंदणी शुल्क प्रतिवर्ष रू. 4000/- इतके करण्यात आलेले आहे. सदर शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहे. शुल्क अदा केलेनंतरच अध्यापक विद्यालयास नोंदणी (Registration) करता येईल.

**२) विद्यार्थी नोंदणी शुल्क :**

जून-2026 या परीक्षेपासून प्रथम वर्ष केवळ नियमित विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी नोंदणी शुल्क रू. 400/- व द्वितीय वर्ष केवळ नियमित विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी नोंदणी शुल्क रू. 400/-इतके करण्यात आलेले आहे. परीक्षेचे आवेदनपत्र भरताना विद्यार्थी नोंदणी शुल्क, परीक्षा शुल्क एकत्रित ऑनलाईन भरावयाचे आहे.

**३) परीक्षा शुल्क**

**डी.एल.एड. परीक्षेसाठी**

| तपशील | शुल्क दर रूपये | परीक्षा शुल्क ऑनलाईन भरण्यात यावे. |
|---|---|---|
| लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा | **प्रति विषय रू. 150/- प्रमाणे** | |

**<u>सदर शुल्काचा तपशील विद्यार्थी व पालकांच्या माहितीसाठी अध्यापक विद्यालयाच्या दर्शनी भागात सूचना फलकावर लावावा.</u>**

परीक्षा शुल्क हे Screen वर दिसणाऱ्या पर्यायानुसार (Option) ऑनलाईन भरावयाचे आहे. त्याची पावती (receipt) आपल्याकडे जपून ठेवायची आहे.

ऑनलाईन नियमित शुल्काने / विलंब शुल्काने /अतिविलंब शुल्काने आवेदनपत्र भरण्याचे

**वेळापत्रक**

| **अ.क्र.** | **तपशील** | **दिनांक** |
|---|---|---|
| १. | नियमित शुल्क भरून अध्यापक विद्यालयाने संगणक प्रणालीद्वारे (Online) आवेदनपत्र सादर करण्याचा दिनांक | **01/04/2026 ते 10/04/2026** |
| २. | विलंब शुल्क भरून अध्यापक विद्यालयाने संगणक प्रणालीद्वारे (Online) आवेदनपत्र सादर करण्याचा दिनांक | **11/04/2026 ते 18/04/2026** |
| ३. | अतिविलंब शुल्कासह अध्यापक विद्यालयाने संगणक प्रणालीद्वारे (Online) आवेदनपत्र सादर करण्याचा दिनांक | **19/04/2026 ते 23/04/2026** |

**टिपः-** 1) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी दि. 23/04/2026 पर्यंतच वेबसाईट सुरू राहील.

2) दि.10/04/2026 या तारखेनंतर आवेदनपत्र भरल्यास दि.18/04/2026 पर्यंत विलंब शुल्क रू.100/- प्रति विद्यार्थी राहील व दि.18/04/2026 नंतर आवेदनपत्र भरल्यास विलंब शुल्क रू. 100/- **+** अतिविलंब शुल्क रू. 50/- प्रतिदिन, प्रतिविद्यार्थी याप्रमाणे राहील, याची नोंद घ्यावी.

**महत्त्वाची सूचनाः-**परीक्षा आवेदनपत्रे भरणेसाठी जो कालावधी निश्चित करून दिलेला आहे त्याच कालावधीमध्ये ऑनलाईन आवेदनपत्र भरणे आवश्यक आहे. निर्धारित कालावधीत आवेदनपत्रे न भरल्यास विद्यार्थ्यांना विलंब शुल्क भरावे लागल्यास किंवा परीक्षेपासून परीक्षार्थी वंचित राहिल्यास त्याला संबंधित अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील, याची सर्व अध्यापक विद्यालय प्राचार्यांनी विशेष दक्षता घ्यावी.

1) डी.एल.एड. परीक्षेस प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांपैकी एकही विद्यार्थी परीक्षा शुल्क न भरता परीक्षेस प्रविष्ठ होणार नाही, याबाबत सर्व अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य यांनी विशेष दक्षता घ्यावी.

2) **परीक्षेचा निकाल जाहीर झालेनंतर परिषदेच्या संकेतस्थळावरून प्राप्त होणाऱ्या गुणपत्रकानुसार अंतिम गुणपत्रकामध्ये (फोटो दुरूस्ती व गुण बदल सोडून) केवळ नावातील स्पेलिंग मिस्टेक याबाबतची दुरूस्ती करावयाची असेल तर प्रती विद्यार्थी रू. 700/- एवढे शुल्क परिषदेकडे प्रथम अदा केले नंतरच सदरची दूरूस्ती केली जाईल, याची सर्व अध्यापक विद्यालयांचे प्राचार्य यांनी विशेष दक्षता घ्यावी.**

3) **सर्व अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांनी डी.एल.एड्. 50 ची EXCEL SHEET हार्ड कॉपी आपल्या जिल्हयाच्या प्राचार्य डाएट यांचेकडेच जमा करावी. परीक्षा परिषदेकडे परस्पर जमा करु नये, याची दक्षता घ्यावी.**

## प्रि-लिस्ट तपासताना घ्यावयाची दक्षता-

www.deledexam.in या परिषदेच्या संकेतस्थळावर दि.24/04/2026 ते दि.28//04/2026 या कालावधीत प्रि-लिस्ट प्रसिध्द केली जाईल. त्यानुसार आवश्यकता असल्यास विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रातील त्रुटींमध्ये दुरूस्ती करता येईल. दि. 28/04/2026 नंतर कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही. जर कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितअध्यापक विद्यालयाच्या प्रचार्याची राहील, यांची दक्षता घ्यावी.

## अध्यापक विद्यालयांना डी.एल.एड. 50 भरण्याबाबत सूचना-

१. डी.एल.एड. परीक्षा जून-2026 (**प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष)** परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे डी.एल.एड.50 चे प्रात्यक्षिक गुण भरणेसाठी परिषदेच्या संकेतस्थळावर दि. 27/04/2026 ते 30/04/2026 या कालावधीत लिंक उघडून देण्यात येईल.

२. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी आपल्या अधिनस्त सर्व अध्यापक विद्यालयांचे डी.एल.एड.50 दि. 04/05/2026 ते 08/05/2026 या कालावधीत तपासून मान्यता (Approval) देणे आवश्यक आहे.

३. दिलेल्या कालावधीमध्ये अचूक माहिती ऑनलाईन पध्दतीने भरावयाची आहे. सदर माहिती चुकीची भरल्यास त्याची जबाबदारी संबंधित अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य यांची राहिल.

४. डी.एल.एड. 50 चे गुण ऑनलाईन भरल्यानंतर सर्व अध्यापक विद्यालयांनी डी.एल.एड. 50 ची Excel Sheet हार्ड कॉपी दि. 11/05/2026 ते 14/05/2026 या कालावधीत प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचेकडे सादर करावी. प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी सर्व, अध्यापक विद्यालयांची हार्ड कॉपी आपले प्रतिनिधिमार्फत परिषदेस विहीत केलेल्या मुदतीत सादर करावी.

**५. ज्या अध्यापक विद्यालयांची हार्ड कॉपी परिषदेस प्राप्त होणार नाही अशा अध्यापक विद्यालयांच्या विद्यार्थ्यांचे गुण दुरूस्तीचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही, याची गांभीर्याने नोंद घ्यावी**.

६. डी.एल.एड. 50 च्या आधारे प्रात्यक्षिक गुणात बदल निकाल जाहीर केलेल्या कालावधीनंतर 5 महिन्यांच्या कालावधी पर्यंतच करण्यात येईल, हा बदल हार्ड कॉपीतील गुण व ऑनलाईन भरलेले गुण यामध्ये तफावत दिसून येत असेल तरच होईल. यामध्ये होणाऱ्या बदलामध्ये हार्डकॉपीतील गुण अंतिम ग्राहय समजण्यात येतील. हार्ड कॉपीमध्ये जे गुण असतील त्यात कोणताही बदल केला जाणार नाही. सदर बदलाकरीता प्रतिविद्यार्थी, प्रति विषय रू. 1000/- याप्रमाणे आर्थिक दंडात्मक कारवाई केली जाईल. सदरची रक्कम अदा केलेनंतरच प्रात्यक्षिक गुणात बदल केला जाईल, याची नोंद घ्यावी.

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## डी.एल.एड्. परीक्षा जून-2026

### विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र भरणेसाठी अध्यापक विद्यालयांना मार्गदर्शक सूचना

### कृतीओघ तक्ता (Flow Chart)

↓

Institute लॉगिंनवर गेल्यांनतर संबंधित अध्यापक विद्यालय Login Id. व Password टाकून Sign in करावे.

↓

Institute Panel Open होईल.

↓

Student Registration वर Click करा.

↓

2016 Pattern वर डी.एल.एड. दिसेल. त्यावर Click करा.

↓

2016 चा Pattern वर Click केले तर Student Information चा फॉर्म Open होईल.

↓

त्यामध्ये अगोदरच्या परीक्षेचा सीट नंबर भरा. तसेच त्या परीक्षेचे वर्ष भरा व Search बटनावर Click करा.

↓

विद्यार्थ्याची माहिती दिसेल त्या खालील सर्व Block भरा व Apply बटनावर Click करा.

↓

वरील बाजूस विद्यार्थ्याचा फोटो Upload करा.

↓

विद्यार्थ्यांचे नाव, माध्यम, इन्स्टिटयुट कोड इत्यादी माहिती दिसेल व त्या खालील विषयकोड प्रमाणे विषय दिसतील व विद्यार्थी या विषयांसाठी बसणार आहे ते विषय रेड कलरच्या रो मध्ये दिसतील.

↓

नंतर Next बटनावर Click करा.

↓

द्वितीय वर्षाचे विद्यार्थी ज्या विषयांसाठी परीक्षेला बसणार आहे ते Subjects दिसतील त्याची खात्री करून Submit बटनावर वर Click केल्यानंतर रजिस्ट्रेशन पूर्ण होते.

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
## ऑनलाईन परीक्षा शुल्क भरणेबाबत सूचना
## कृतीओघ तक्ता (Flow Chart)

↓

Institute Panel वरील Payments वर Click केल्यानंतर
D.El.Ed. साठी 2016 Student Payment Option दिसतील.

↓

D.El.Ed. साठी 2016 वर Select केल्यानंतर
Student Exam Payment Panel दिसेल.

↓

त्यावर त्यातील Instruction प्रमाणे Filter ड्रॉप डाउनमध्ये
All, Paid, व Pending हे Option दिसतील. त्यातील Pending Option Select करावा.
नंतर Search बटनावर Click करावे.

↓

ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा फी भरावयाची आहे, त्या विद्यार्थ्यांची यादी तपशीलासह दिसेल.

↓

उजव्या बाजूला असलेल्या बॉक्समध्ये सर्व रजिस्टर झालेल्या विद्यार्थ्यांचे एकूण भरावयाचे परीक्षा
शुल्क दिसेल व ते भरण्यासाठी ऑनलाईन बटनवर Click करा.

↓

त्यानंतर Payment gateway Open होतो. त्यावर Online Payment करावे.

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
## प्राथमिक शिक्षण पदविका परीक्षा : **जून**-2026
## डी.एल.एड्. (प्रथम वर्ष)
# वेळापत्रक

| दिनांक | वार | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| 02/06/2026 | मंगळवार | 11.00 ते 01.00 | बालकाचा विकास व स्व ची जाणीव (एफ-१)<br>Child Development and Self Awareness (F-1) | 40 |
| 03/06/2026 | बुधवार | 11.00 ते 01.00 | शिक्षण प्रक्रिया व समाज (एफ-२)<br>Educational Process and Society (F-2) | 40 |
| 04/06/2026 | गुरुवार | 11.00 ते 01.00 | अभ्यासक्रम, अध्ययन- अध्यापनशास्त्र आणि मूल्यमापन (एफ-३)<br>Curriculum, Pedagogy and Evalulation (F-3) | 40 |
| 05/06/2026 | शुक्रवार | 11.00 ते 01.00 | इंग्रजी भाषा संप्रेषण व प्रभुत्व भाग-१ (एफ-४)/<br>Proficiency in Language (English) (Part-I) (F-4)<br>मराठी भाषा संप्रेषण व प्रभुत्व भाग-१ (एफ-४)<br>Proficiency in Language (Marathi) (Part-I) (F-4) | 40 |
| 06/06/2026 | शनिवार | 11.00 ते 01.00 | भाषा विषयाचे अध्ययन-अध्यापनशास्त्र (प्रथम/तृतीय भाषा) (एफ-५)<br>Pedagogy of Language (I & III Language) (F-5) | 40 |
| 07/06/2026 | रविवार | सुट्टी | | |
| 08/06/2026 | सोमवार | 11.00 ते 12.00 | इंग्रजी अध्ययन - अध्यापन शास्त्र भाग-१ (एफ-६)<br>Pedagogy of English (Part-I) (F-6) | 20 |
| 09/06/2026 | मंगळवार | 11.00 ते 01.00 | गणित अध्ययन - अध्यापनशास्त्र (एफ-७)<br>Pedagogy of Mathematics (F-7) | *40* |
| 10/06/2026 | बुधवार | 11.00 ते 01.00 | परिसर अभ्यास अध्ययन- अध्यापनशास्त्र (एफ-८)<br>Pedagogy of Environmental Science (F-8) | 40 |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

प्राथमिक शिक्षण पदविका परीक्षा : **जून**-2026

# डी.एल.एड्. (द्वितीय वर्ष)

# वेळापत्रक

| **दिनांक** | **वार** | **वेळ** | **विषय** | **गुण** |
|---|---|---|---|---|
| 02/06/2026 | मंगळवार | 03.00 ते 05.00 | भारतीय समाज आणि शिक्षण (एस-१)<br>Indian Society & Education (S-1) | 40 |
| 03/06/2026 | बुधवार | 03.00 ते 05.00 | शालेय संस्कृती, व्यवस्थापन, नेतृत्व व परिवर्तन (एस-२)<br>School Culture, Management, Leadership & Transformation ( S-2) | 40 |
| 04/06/2026 | गुरुवार | 03.00 ते 05.00 | शिक्षणातील नवीन विचारप्रवाह (एस-३)<br>New Trends in Education (S-3) | 40 |
| 05/06/2026 | शुक्रवार | 03.00 ते 04.00 | इंग्रजी भाषा संप्रेषण व प्रभुत्व भाग-२ (एस-४)/<br>Proficiency in Language (English) (Part-II) (S-4)<br>मराठी भाषा संप्रेषण व प्रभुत्व भाग-२ (एस-४)<br>Proficiency in Language (Marathi) (Part-II) (S -4) | 20 |
| 06/06/2026 | शनिवार | 03.00 ते 05.00 | द्वितीय भाषा : अध्ययन-अध्यापन शास्त्र (एस-५)<br>Pedagogy of Second Language (S-5) | 40 |
| 07/06/2026 | रविवार | सुट्टी | | |
| 08/06/2026 | सोमवार | 03.00 ते 04.00 | इंग्रजी : अध्ययन- अध्यापन शास्त्र भाग-२ (एस-६)<br>Pedagogy of English (Part-II) (S-6) | 20 |
| 09/06/2026 | मंगळवार | 03.00 ते 05.00 | विज्ञान व गणित : अध्ययन - अध्यापनशास्त्र (एस-७)<br>Pedagogy of Science : Mathematics (S-7) | *40* |
| 10/06/2026 | बुधवार | 03.00 ते 05.00 | सामाजिकशास्त्र : अध्ययन- अध्यापनशास्त्र (एस-८)<br>Pedagogy of Social Science (S-8) | 40 |